महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:-डब्ल्यूईबी-१०२०/सीआर-२६/२०२१/तेवीस दिनांक:-०५ ऑक्टोबर, २०२१

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:-ऑनलाईन अर्जप्रणाली-खाते अद्ययावत करण्यासंदर्भात**

संदर्भ:- दिनांक २७ मे, २०२१, दिनांक ११ ऑगस्ट, २०२१ व दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ रोजीचे प्रसिध्दीपत्रक

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या https://mpsconline.gov.in ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळावरील खात्याचा पासवर्ड व खात्यातील तपशील अद्ययावत करण्यासंदर्भात आयोगाच्या संदर्भिय प्रसिध्दीपत्रकांन्वये सूचना करण्यात आली होती. तथापि, खाते अद्ययावत करताना बरेचसे उमेदवार संदर्भिय प्रसिध्दीपत्रकान्वये करण्यात आलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करत नसल्याने उमेदवारांना तांत्रिक अडचणी भेडसावत असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले आहे.

२. आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या जुन्या संकेतस्थळावरील उमेदवारांची सर्व खाती (Profiles) नवीन संकेतस्थळावर स्थलांतरीत करण्यात आली आहेत. जुन्या संकेतस्थळावर खाते असलेल्या उमेदवारांनी नवीन संकेतस्थळावर पहिल्यावेळी लॉगीन करण्यापूर्वी खात्याचा पासवर्ड अद्ययावत/पुनर्स्थापित करावा व तदनंतर खाते अद्ययावत करावे. पासवर्ड अद्ययावत/पुनर्स्थापित न करता खात्यामध्ये लॉगीन करता येणार नाही.

३. जुन्या संकेतस्थळावर खाते असतानाही नवीन संकेतस्थळावर वेगळे खाते तयार करण्याचा प्रयत्न केल्यास प्रणालीद्वारे दोन्ही खाती गोठवली जाऊन उमेदवारास अर्ज करण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात. यास्तव, जुन्या संकेतस्थळावर खाते असलेल्या उमेदवारांनी नवीन संकेतस्थळावर नव्याने खाते तयार करु नये.

४. जुन्या संकेतस्थळावरील खात्यामध्ये नमूद मोबाईल क्रमांक व/अथवा ईमेल आयडी विसरला असल्यास अथवा अन्य कोणत्याही कारणामुळे वापरता येत नसल्यास ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळाच्या मुखपृष्ठावरील 'Forgot/Reset Email Id and Mobile Number' या लिंकवरुन मोबाईल क्रमांक व/अथवा ईमेल आयडी अद्ययावत करता येईल.

५. आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळावरील खात्याचा वापर करण्यासंदर्भात उमेदवारांसाठी मार्गदर्शक सूचना / प्रक्रिया सदर संकेतस्थळावरील 'Guidelines for Candidate' अंतर्गत उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. सदर प्रक्रिया / सूचनांचे अवलोकन केल्यास उमेदवारांना खाते अद्ययावत करणे सुलभ होऊ शकेल.

ठिकाण:- मुंबई

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.